वस्त्रोद्योग धोरणाअंतर्गत व्याज अनुदान योजनेखाली प्रस्ताव दाखल करण्याची मुदत देणे तसेच अतिरीक्त उभारणी कालावधी रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.४३७ /टेक्स-५
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दि. २५ नोव्हेंबर,२०२२

वाचा -

१) शासन निर्णय ,सपववि क्र. धोरण- २०११/प्र.क्र.३३५/टेक्स-२ दि.२ जानेवारी,२०१२
२) शासन निर्णय ,सपववि क्र. धोरण- २०१२/प्र.क्र.१/टेक्स-२ दि.१ मार्च,२०१२

प्रस्तावना-

महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत संदर्भ क्र. २ येथिल शासन निर्णयान्वये दीर्घ मुदती कर्जाशी निगडीत व्याज सवलत योजना योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत २ वर्षाचा उभारणी कालावधी देण्यात आला आहे. त्यानंतरचा उभारणी कालावधी या योजनेखाली पात्र नाही. तथापी कोविड-१९ च्या कालावधीत RBI ने उद्योगांना अतिरीक्त Moratorium कालावधी उपलब्ध करून दिला होता. त्यानुसार बँकांनी वस्त्रोद्योग प्रकल्पांचे अनुदान मागणीचे प्रस्ताव या उभारणी कालावधीसह शासनाकडे दाखल केले आहेत. अशा प्रकारे अतिरीक्त Moratorium कालावधीस प्रस्ताव दाखल केल्याने त्या प्रस्तावात परतफेडीची रक्कम कमी न होता जशीच्या तशी राहते त्यामुळे अतिरीक्त व्याज अनुदान शासनास देय्य ठरते. सदर अतिरीक्त अनुदान देता येणार नाही. त्यामुळे बँकांनी वस्त्रोद्योग प्रकल्पांना जरी Moratorium कालावधी दिला असेल तरी शासनाकडे अनुदानाची मागणी करतांना प्रकल्पांच्या मुळ परतफेडीच्या वेळापत्रकानुसारच अनुदानाचे दावे दाखल करणे गरजेचे आहे. शासनाकडे अशा प्रकारे अतिरीक्त Moratorium घेऊन दाखल झालेले सर्व दावे शासन स्तरावरून रद्द करण्यात येतील. त्यामुळे अधिक Moratorium कालावधि देऊन बँकांनी प्रस्ताव दाखल करू नयेत अशा सुचना बँकांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

त्याचप्रमाणे व्याज अनुदान या योजनेत प्रकल्पांचा तिमाही संपुष्टात आल्यावर बँकेने पुढील तिमाहित त्यांच्या अनुदानाचा प्रस्ताव दाखल करणे गरजेचे आहे. तथापी बँका तसे न करता ब-याच उशिराने या प्रकल्पाचे दावे दाखल करतात. त्यामुळे शासन स्तरावर कित्येक वर्षाचे अनुदान मागणीचे दावे एकत्र दाखल होतात. व्याज अनुदान योजना शेवटच्या टप्यात आहे असे असतांना कित्येक प्रकल्पांचे सन २०१२, २०१३, २०१४ चे दावे बँकांनी दाखल केलेले नाहीत. हे विचारात घेता बँकांना व्याज अनुदान योजनेखाली डिसेंबर २०२१ पर्यंतचे दावे दाखल करण्यासाठी अंतिम मुदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

## शासन निर्णय -

प्रस्तावनेतील माहिती विचारात घेता राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणांतर्गत व्याज अनुदान योजनेखाली या योजनेत विहित केल्यानुसार जो Moratorium दिला आहे त्या व्यतीरीक्त अन्य Moratorium चा लाभ देऊन बँकांनी प्रस्ताव दाखल करण्यात येऊ नयेत. वस्त्रोद्योग प्रकल्पांना बँकांनी अतिरीक्त Moratorium कालावधी जरी दिला असेल तरी शासनाकडे अनुदानाची मागणी करतांना प्रकल्पांच्या मुळ परतफेडीच्या वेळापत्रकानुसारच बँकांनी अनुदानाचे दावे दाखल करावेत. अशा प्रकारे अतिरीक्त Moratorium नुसार जे प्रस्ताव शासनाकडे दाखल झालेले असतील ते प्रस्ताव शासन स्तरावरून रिसेट करण्यात येतील.

२. वस्त्रोद्योग धोरणांतर्गत व्याज अनुदान योजनेखाली डिसेंबर २०२१ पर्यंतचे सर्व दावे दाखल करण्यासाठी या शासन निर्णयाच्या तारखेपासून एक महिन्याची मुदत बँकांना देण्यात येत आहे. या मुदतीनंतर डिसेंबर २०२१ चे दावे दाखल करता येणार नाही. तसेच जे प्रकल्प NPA आहेत त्यांचे दावे बँकेने दाखल करू नयेत व प्रकल्प NPA असल्यास त्याचे पुर्वी दावे दाखल केलेले असल्यास त्याबाबत शासनास कळवावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२११२५११४४३३१९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MADANE VISHAL VISHWAS

(विशाल मदने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
५. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
८. सचिव (वस्त्रोद्योग), मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. महाराष्ट्र राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणा अंतर्गत सर्व नोंदणीकृत बँका/वित्तिय संस्था
११. निवड नस्ती (कार्यासन टेक्स-५).